RELIANCE

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**
एच ब्लॉक, १ला मजला, धीरुभाई अंबानी नॉलेज सिटी,
नवी मुंबई – ४०० ७१०
संकेतस्थळ: www.relianceenergy.in

# सार्वजनिक सूचना

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरइन्फ्रा) चा वितरण परवानाचे अभिहस्तांकन सोबत वितरण प्रणालीच्या मालमत्तेचे हस्तांतरण रिलायन्स इलेक्ट्रिक जनरेशन अँड सप्लाय लिमिटेड (आरईजीएसएल) करण्यासाठी आणि आरईजीएसएलच्या भागधारणेची १००% विक्री अदानी ट्रान्समिशन लिमिटेड ह्यांना विद्युत आधिनियम, २००३च्या कलम १७(३) अंतर्गत आरइन्फ्रा आणि आरईजीएसएल यांच्याद्वारे सादर करण्यात आलेल्या याचिकेवर अभिप्राय/सूचना आणि/किंवा हरकती.**
**(२०१७चे प्रकरण क्र. १४०)**

१. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरइन्फ्रा) चा पारेषण परवानाचे अभिहस्तांकन सोबत पारेषण प्रणालीच्या मालमत्तेची हस्तांतरण आरईजीएसएलला करण्यासाठी आणि आरईजीएसएलच्या भागधारणेची १००% विक्री अदानी ट्रान्समिशन लिमिटेड ह्यांना विद्युत आधिनियम, २००३च्या कलम १७(३) अंतर्गत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासमोर (म.वि.नि.आ) याचिका दाखल केलेली आहे. म.वि.नि.आ यांनीह्या याचिकेवर जनतेकडून सूचना आणि/किंवा हरकती मागविण्यासाठी आरइन्फ्राला ह्या कायद्याच्या कलम ६४(२) अंतर्गत सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

२. या याचिकेची ठळक वैशिष्ट्ये खाली दिलेली आहेत:

क. माननीय मुंबई उच्चन्यायालयाने २०१६च्या कंपनी योजना याचिका क्र. ४४० आणि ४४१ मध्ये त्यांच्या दिनांक १९.०१.२०१७च्या निर्णयाद्वारे आणि आदेशान्वये आरइन्फ्राच्या विद्युतनिर्मिती, पारेषण आणि वितरण यांचा समावेश असलेल्या मुंबई पॉवर डिव्हिजन समालकोट पॉवर डिव्हिजन, गोवा पॉवरस्टेशन डिव्हिजन आणि विंडमिल डिव्हिजन यांचे हस्तांतरण आरईजीएसएलला गोईंग कन्सर्न बेसिसवर, कंपनीकायदा, २०१३ च्या अंतर्गत, व्यवस्थेच्या योजनेला मान्यता दिलेली आहे.

ख. आरइन्फ्राचे आणि आरईजीएसएलचे संचालक यांची संचालक मंडळाची समिती दिनांक ३०.१०.२०१७ रोजी आयोजित केलेल्या सभेत असा निर्णय घेतलेला आहे की, व्यवस्थेच्या योजनेच्या कलम ७.३.४ अनुसार, समालकोट डिव्हिजन, गोवा डिव्हिजन आणि विंडपॉवरअसेट डिव्हिजन ह्या आरइन्फ्राकडून आरईजीएसएलकडे हस्तांतरित केल्या जाणार नाहीत.

ग. मुंबई पॉवर डिव्हिजनमधील सर्व कर्मचारी (एक्झिक्युटिव्हज् – १७०९ आणि नॉन–एक्झिक्युटिव्हज् – ३५९१) आरईजीएसएल कडे हस्तांतरीत केले जात आहेत. सदर कर्मचारी विद्युत निर्मिती, पारेषण, वितरण या विभागाचे असून अभियांत्रिकी, वाणिज्यिक, नियामक, लेखा, वित्त, मनुष्य बळ, जनसंपर्क, लाईनस्टाफ इत्यादी विषयानमधील तज्ञ आहेत.

घ. सांताक्रुझ येथील चारजमिनीचे तुकडे, जेसध्या आरइन्फ्राच्या परवानाप्राप्त वितरण व्यवसायाच्या मालमत्तांचा भाग आहेत ते आरइन्फ्राने रु.२५० कोटी एवढ्या मोबदल्याच्या बाबतीत स्वत:कडे ठेवून घेण्याचे प्रस्तावित आहे. मोबदल्याच्याह्या रक्कमेचा हिशोब महाराष्ट्रशासनाने २०१७–१८ साठी निर्धारित केलेल्या शीघ्र गणकानुसार (रेडी रेकनर) दरयोग्य मूल्यावर आधारित केलेला आहे आणि तो माननीय विद्युतअपीलीय लवादाने २०१२च्या अपील क्र. १६०आणि अपीलांच्या बेंचमध्ये दिनांक ०८.०४.२०१५ रोजी दिलेल्या निकालामध्ये घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आहे.

च. आरइन्फ्राने मुंबई पॉवर डिव्हिजन आरईजीएसएल यांच्याकडे हस्तांतरित केल्याच्या अनुषंगाने, आरइन्फ्रा, आरईजीएसएल आणि अदानी यांनी सह्या केलेल्या दिनांक २१.१२.२०१७च्या भागखरेदी करारातील नियम आणि अटींच्या अधीन राहून आरइन्फ्राने अदानी ट्रान्समिशन लि. (अदानी) यांना आरईजीएसएलच्या भागधारणेची १००% विक्री करण्याचे मान्य केलेले आहे आणि अदानी यांनी आरइन्फ्राकडून खरेदीकरण्याचे मान्य केलेले आहे.

छ. आरइन्फ्राचा परवानाप्राप्त विद्यमानव्यवसाय (कर्मचाऱ्यांसह) आरईजीएसएलला ''गोईंग कन्सर्न बेसिसवर'' हस्तांतरित करण्यात येत आहे आणि म्हणून सध्या आरइन्फ्राकडे परवानाप्राप्त व्यवसाय चालविण्यासाठी जसे तांत्रिक प्रावीण्य उपलब्ध आहे, ते सर्व आरईजीएसएलकडेही असेल. त्याचप्रमाणे अदानी हे विद्युतनिर्मिती, पारेषण आणि वितरण व्यवसायातील संपूर्ण मनुष्यबळासह हा व्यवसाय ''गोईंग कन्सर्न बेसिसवर'' अधिग्रहित करतील, त्यामुळे त्यांच्याकडे सर्व प्रकारचे प्रावीण्य असेल.

ज. आरईजीएसएल आणि अदानी यांनी विद्युत वितरण परवान्यानुसार (पुरेशा भांडवलाची आतिरिक्त आवश्यकता, पतप्रतिष्ठा आणि आचारसंहिता) नियम, २००५ नुसार अनुपालन केलेले आहे.

झ. या प्रस्तावित व्यवहारामुळे ग्राहकांच्या दरांवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही, कारण दरनिश्चितीही नियामक हिशोबपुस्तकांवर आधारित असते आणि त्यांच्यामध्ये बदल होणार नाहीत.

३. खालील दस्तऐवजांच्या प्रतीलेखी विनंती करून आरइन्फ्राच्या खाली उल्लेख केलेल्या कार्यालयांकडून प्राप्त करता येतील:

क. याचिकेचा कार्यकारीसारांश (नि:शुल्क, इंग्रजीत किंवा मराठीत)

ख. याचिकेचे तपशीलवार दस्तऐवज (इंग्रजीत) (१००/– रुपयेरोख रक्कम/''रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड'' यांच्या नावे असलेल्या डीडी/धनादेशाद्वारे भरल्यानंतर).

ग. याचिकेच्या तपशीलवार दस्तऐवजांची सीडी (इंग्रजीत) (५०/– रु. एवढी रक्कम भरल्यानंतर)

**कार्यालये:**

| कार्यालय | पत्ता | दूरध्वनी/फॅक्स क्र. |
|---|---|---|
| नोंदणीकृत कार्यालय आणि मुख्य कार्यालय | एच ब्लॉक, १ला मजला, धीरुभाई अंबानीनॉलेज सिटी, नवी मुंबई – ४०० ७१० | दूरध्वनी:+९१–२२–३०३७ ३३३३/ ३३०३ १००० फॅक्स:+९१–२२–३०३८६१७८/३३०३ ३६४६ |
| कार्यालय | देवीदासलेन, एसव्हीपी रोड लगत, देवीदास दूरध्वनी केंद्राजवळ, बोरीवली (प.), मुंबई – ४०० १०३ | दूरध्वनी:+९१–२२–३००९ ९९९९ फॅक्स: +९१–२२–३००९ ८८५२ |
| उत्तर विभाग | ३६९ डी, शंकरलेन आणि एसव्हीरोड यांचेजंक्शन, कांदिवली(प.), मुंबई – ४०० ०६७ | दूरध्वनी:+९१–२२–३००९ ६९९९ फॅक्स:+९१–२२–३००९ ४५८० |
| मध्य विभाग | पश्चिम द्रुतगती मार्ग, पटेल अॅल्युमिनिअम समोर, दिंडोशी गोरेगाव (पू.), मुंबई– ४०० ०९७. | दूरध्वनी:+९१–२२–३००९ ६९९९ फॅक्स:+९१–२२–३००९ ४८४४ |
| दक्षिण–मध्य विभाग | इ–४, एमआयडीसी, अंधेरी (पू.), मुंबई – ४०० ०९३. | दूरध्वनी:+९१–२२–३००९ ६९९९ फॅक्स:+९१–२२–३००९ ४३४१ |
| दक्षिण विभाग | आरएनए कॉर्पोरेट पार्क, जुनेकला मंदिर, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ, वांद्रे (पू.), मुंबई – ४०० ०५१. | दूरध्वनी:+९१–२२–३००९ ६९९९ फॅक्स:+९१–२२–३००९ ६२६३ |
| पूर्व विभाग | सहकार सिनेमाजवळ, टिळक नगर, रोड क्र. ३, चेंबूर, मुंबई – ४०० ०८९. | दूरध्वनी:+९१–२२–३००९ ६९९९ फॅक्स:+९१–२२–३००९ २०२२ |

४. आयोगाने आरइन्फ्राला त्यांच्याह्या याचिकेवर ह्यासूचनेच्या माध्यमातून जनते कडून कुरिअर द्वारे, हातीपोच किंवा फॅक्स किंवा ई–मेल द्वारे सूचना आाणि हरकती मागविण्याचे निर्देश दिलेले आहेत. सूचना आणि हरकती इंग्रजी किंवा मराठीत १+५ प्रतींमध्ये, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्याकडे, १३वा मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई – ४०० ००५ (फॅक्स: ०२२ २२१६३९७६, ई–मेल: mercindia@merc.gov.in) यांच्याकडे दिनांक **३१ मे २०१८**, पर्यंत सहायक उपाध्यक्ष, नियामक कामकाज, ७वा मजला, देवीदासलेन, एसव्हीपी रोड लगत, देवीदास दूरध्वनी केंद्रा जवळ, बोरीवली (प.), मुंबई– ४०० १०३ (फॅक्स: ०२२ ३००९८८५२, ई–मेलआयडी:ghanshyam.thakkar@relianceada.com) यांना ही पाठविल्याच्या पुराव्या सह सादर केल्या जाऊ शकतात आणि त्यांच्या मध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, टपालासाठीचा पत्ता आणि असल्यास ई–मेलआयडी असला पाहिजे. सूचना किंवा हरकत एखाद्या संस्थेच्या किंवा ग्राहकांच्या संवर्गाच्यावतीने सादरकेली जात आहे किंवा काय ह्याचाही उल्लेख केला पाहिजे. पाठविणारा सुनावणी सप्रत्यक्ष उपस्थित राहू इच्छितो/ते किंवा काय ह्याचाही उल्लेख असायला हवा आणि असे असल्यास आयोगा कडून **सेंट्रम हॉल, पहला मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई – ४०० ००५ येथे दिनांक १४ जुन २०१८, रोजी ११:00 वाजता** होणाऱ्या सुनावणी मध्ये संधी दिली जाईल, ज्यासाठी वेगळी सूचना दिली जाणार नाही.

५. आरइन्फ्रा द्वारा सूचना/हरकत मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत प्रत्येक सूचनेला/हरकतीला उत्तर देण्यात येईल परंतु **३१ मे २०१८** पर्यत मिळालेल्या सर्व सूचना/हरकतींना **४ जुन २०१८** पुर्वी उत्तर देण्यात येईल. आरइन्फ्रा द्वारा देण्यात आलेल्या प्रतिसादासाठी सार्वजनिक सुनावणीच्या वेळी किंवा **७ जुन २०१८** पर्यंत पुरवण्या सादर करता येतील.

६. याचिकेचे तपशीलवार दस्तऐवज आणि कार्यकारी सारांश आरइन्फ्राच्या www.relianceenergy.in/web/relenergy/regulatory ह्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे आणि कार्यकारी सारांश आयोगाच्या www.mercindia.org.in/www.merc.gov.in ह्या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्याजोग्या फॉरमॅटमध्ये (नि:शुल्क) उपलब्ध आहे.

सही
(आशय खांडवाला)
रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

मुंबई
दिनांक: १० मे २०१८